राज्यात राबविण्यात येणाऱ्या "मुख्यमंत्री समृध्द पंचायतराज अभियान" च्या अनुषंगाने होणाऱ्या खर्चासाठी जिल्हा परिषद सेस फंडातून (स्वनिधी) १०% निधी राखुन ठेवणेबाबत.

# महाराष्ट्र शासन

## ग्रामविकास व पंचायत राज विभाग

शासन निर्णय क्रमांकः जिपका-२०२५/प्र.क्र.९९/वित्त-३
बांधकाम भवन, मर्झबान पथ, फोर्ट
मंत्रालय, मुंबई-४००००१
दिनांक : ०४ नोव्हेंबर,२०२५

**वाचा:-**

ग्राम विकास विभागाचा शासन निर्णय क्र. मुसपंअ-२०२५/प्र.क्र.१५२, E-११२३०५७/यो-११, दि. ०६ ऑगस्ट, २०२५.

**प्रस्तावना :-**

ग्रामीण महाराष्ट्राच्या विकासामध्ये पंचायत राज संस्थांचे मोठे योगदान असुन राज्यातील विकासाच्या बहुतांश योजना पंचायत राज संस्था / स्थानिक स्वराज्य संस्थामार्फत राबविल्या जातात. सदर योजनांची प्रभावी व जलदगतीने अंमलबजावणी करुन त्यांचा लाभ ग्रामीण भागातील शेवटच्या घटकापर्यंत पोहचविण्यासाठी पंचायत राज संस्थांना गतिमान करणे आवश्यक आहे. त्यानुषंगाने ग्रामीण भागात स्थानिक स्वराज्य संस्था म्हणून काम करणाऱ्या ग्रामपंचायत, पंचायत समिती व जिल्हा परिषदांना कामगिरीनुसार प्रोत्साहित करुन त्यांची कार्यक्षमता वाढविण्याकरिता उत्कृष्ट काम करणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांसाठी सन २०२५-२६ या आर्थिक वर्षापासून तालुका, जिल्हा, महसूल विभाग व राज्य अशा चार स्तरांवर "मुख्यमंत्री समृध्द पंचायतराज अभियान" हे पुरस्कार अभियान राबविण्यात येत आहे. सदर अभियानांतर्गत समाविष्ट घटकांवर झालेल्या कामगिरीच्या आधारे गुणांकन करुन स्थानिक स्वराज्य संस्थांची पुरस्कारासाठी निवड केली जाणार आहे. त्यामुळे अभियान कालावधीत जास्तीत जास्त लोकांना / ग्रामपंचायतींना सहभागी करुन घेण्यासाठी जिल्हा व तालुका स्तरावर व्यापक प्रसिध्दी देणे तसेच संबंधित अधिकारी /कर्मचारी यांची क्षमता बांधणी, प्रशासकीय खर्च, प्रचार प्रसिध्दी, कार्यशाळा, प्रशिक्षण, मेळावे, यशोगाथा फिल्म, तांत्रिक सल्लागार व इतर अनुषंगिक खर्चासाठी जिल्हा परिषदांना अभियाना अंतर्गत कमी प्रमाणात निधी उपलब्ध होत असल्यामुळे जिल्हा परिषदांना त्यांच्या स्वनिधी (सेस फंड) मधून "मुख्यमंत्री समृध्द पंचायतराज अभियानासाठी १०% निधी राखीव ठेवण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यानुषंगाने शासन पुढीलप्रमाणे निर्णय घेत आहे.

**शासन निर्णय:-**

उपरोक्त पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री समृध्द पंचायतराज अभियानाच्या प्रभावी अंमलबजावणी करिता सर्व संबंधित अधिकारी व प्राधिकारी यांना पुढीलप्रमाणे दिशानिर्देश देण्यात येत आहेत :-

Scanned with OKEN Scanner

१. राज्यात राबविण्यात येत असलेल्या "मुख्यमंत्री समृध्द पंचायतराज अभियान" योजनेकरिता जिल्हा परिषदांच्या स्वनिधी (सेस फंडातुन) प्रत्येक वर्षी किमान १०% निधी राखीव ठेवण्यास या शासन निर्णयाव्दारे मान्यता देण्यात येत आहे.

२. या निधीचा विनियोग संबंधित जिल्हा परिषदेने अभियानात समाविष्ट घटकांच्या अनुषंगाने प्राप्त प्रस्तावांसाठी त्याच आर्थिक वर्षात शासनाने नेमून दिलेल्या कालावधीतच करणे बंधनकारक राहील.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२५११०४१८१५४९६६२० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

RAVIKUMAR BALAJIRAO LINGANWAD

(र. बा. लिंगनवाड)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा. राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांचे सचिव, राजभवन मुंबई.
२. मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मा. अध्यक्ष/ उपाध्यक्ष, विधानसभा, विधानभवन, मुंबई
४. मा. सभापती/ उपसभापती, विधानपरिषद, विधानभवन, मुंबई
५. मा.विरोधी पक्षनेता, विधानसभा, मुंबई यांचे कार्यालय, विधानभवन, मुंबई
६. मा.विरोधी पक्षनेता, विधानपरिषद, मुंबई यांचे कार्यालय, विधानभवन, मुंबई
७. सर्व मा. विधानसभा व विधानपरिषद सदस्य
   I. मा. मंत्री (सर्व) यांचे खाजगी सचिव
   II. मा. राज्यमंत्री (सर्व) यांचे खाजगी सचिव
८. मा. मंत्री , ग्राम विकास विभाग यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
९. प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, मंत्रालय, मुंबई
१०. प्रधान सचिव (ग्राम विकास विभाग) यांचे स्वीय सहाय्यक, ग्राम विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
११. सर्व उप सचिव, ग्राम विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
१२. सर्व विभागीय आयुक्त
१३. सर्व जिल्हाधिकारी
१४. अध्यक्ष, सर्व जिल्हा परिषद
१५. महालेखापाल, महाराष्ट्र-१ (लेखा परीक्षा), मुंबई (पाच जादा प्रतीसह)
१६. महालेखापाल, महाराष्ट्र-२ (लेखा परीक्षा), नागपूर (पाच जादा प्रतीसह)
१७. महालेखापाल, महाराष्ट्र-१ (लेखा व अनुज्ञेयता), मुंबई (पाच जादा प्रतीसह)



Scanned with OKEN Scanner